ISSN : 2347-4777

# INTERNATIONAL JOURNAL OF CULTURAL STUDIES AND SOCIAL SCIENCES

(UGC approved Multi-disciplinary Peer-Reviewed Journal)
UGC Journal Serial No.49228 in 2019 list
Currently Indexed in UGC CARE LIST, Serial No.159 in 2022 list

Vol-20, Issue-1, No.21, January - June: 2024



Eds.
Amitava Roy, Ronan Paterson,
Bryan Reynolds, Subir Dhar, Papia Mitra

A Special Publication of
Tagore Gandhi Institute
The Shakespeare Society of Eastern India.

ap

UGC APPROVED JOURNAL 2017

Serial No. 49228

UGC Journal Details

| | |
|---|---|
| Name of the Journal | International Journal of CulturalStudies and Social Sciences |
| ISSN Number | 23474777 |
| Source | UNV |
| Subject | Cultural Studies, English Literature |
| Publisher | AVANTGARDE PRESS |
| Country of Publication | India |
| Broad Subject Category | Arts & Humanities;Multidisciplinary |

UGC-CARE LIST SINCE 2019

| Sr.No. | Journal Title | Publisher | ISSN | E-ISSN | UGC-CARE coverage year | Details |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Acta Fytotechnica et Zootechnica | Slovak University of Agriculture in Nitra | 1335-258X | 1336-9245 | from June - 2019 to July - 2020 | Indexed in Scopus |
| 2 | Acta Graphica | Faculty of Graphic Arts, University of Zagreb | 0353-4707 | 1848-3828 | from June - 2019 to October - 2020 | Discontinued from Oct. 2020 |

UGC-CARE LIST SINCE 2022

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 165 | International Journal of Cultural Studies and Social Sciences | Avantgarde Press, Tagore-Gandhi Institute/Shakespeare Society | 2347-4777 | NA | from January - 2020 to Present | View |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 430 | Theatre International | Avantgarde Press, Tagore-Gandhi Institute/Shakespeare Society | 2278-2036 | NA | from January - 2020 to Present | View |

# Index



| S.No. | Title of the Article | Page No. |
|---|---|---|
| 1 | एक देश एक निवडणूक ऐतिहासिक अध्ययन | 1 |
| 2 | सीतापुर जनपद के नगरों में स्त्री–पुरुष साक्षरता का तुलनात्मक अध्ययन | 5 |
| 3 | वर्तमान दौर में खेलों का मानव के जीवन में महत्त्व | 11 |
| 4 | ROLE OF TECHNOLOGY IN BOOSTING PHYSICAL EDUCATION AND SPORTS TRAINING | 15 |
| 5 | EMPOWERING EDUCATION: THE NATIONAL EDUCATION POLICY 2020 AND THE CRUCIAL FUNCTION OF LIBRARIANS | 19 |
| 6 | CASHLESS TRANSACTION & IT'S IMPACT ON RURAL ECONOMY (With Reference To Dharmabad Taluka Of Nanded District) | 21 |
| 7 | WOMEN ENTREPRENEURSHIP: A CASE STUDY OF SMALL SCALE WOMEN ENTREPRENEURS IN KERALA | 26 |
| 8 | THE ROLE OF LIBRARIAN IN THE DIGITAL TRANSFORMATION ERA | 33 |
| 9 | ROLE AND CONTRIBUTION OF FEMALE LABOUR WORK FORCE IN THE DEVELOPMENT OF INDIA | 37 |
| 10 | EFFECTIVE HUMAN RESOURCE MANAGEMENT THROUGH 'HR ANALYTICS | 41 |
| 11 | INTERNATIONAL BUSINESS & ENVIRONMENT MANAGEMENT: NAVIGATING A COMPLEX LANDSCAPE | 45 |
| 12 | अकोला जिल्ह्यातील नरनाळा किल्ल्याचा इतिहास : एक अभ्यास | 49 |
| 13 | ANALYSIS OF THE STUDY CRYPTO CURRENCY TRENDS IN INDIAN MARKET | 54 |
| 14 | ROLE OF ARTIFICIAL INTELLIGENCE IN COMMERCE AND INDUSTRY IN INDIA | 57 |
| 15 | RECENT TRENDS IN AGRICULTURAL TOURISM IN MAHARASHTRA | 60 |
| 16 | COMPARATIVE ANALYSIS OF INDIA'S FOREIGN TRADE POLICY: 2015-2020 VS. 2023-2024 - CHALLENGES AND OPPORTUNITIES | 66 |
| 17 | A COMPARATIVE STUDY OF PERIOD OF VISIT AND FREQUENCY OF PURCHASE OF GROCERY FROM MICRO & MACRO RETAIL SHOP IN AKOLA AND BULDANA DISTRICT | 75 |
| 18 | A STUDY ON ROLE AND SIGNIFICANCE OF ICT AND E-GOVERNANCE FOR RURAL DEVELOPMENT OF MAHARASHTRA STATE | 79 |
| 19 | AN IMPACT OF ARTIFICIAL INTELLIGENCE IN E-COMMERCE | 85 |

*International Journal of Cultural Studies and Social Sciences*

# एक देश एक निवडणूक ऐतिहासिक अध्ययन

**प्रा. सुरेंद्र हरिभाऊ किन्हीकर** राज्यशास्त्र विभाग प्रमुख श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी जि. अमरावती मो.क्र. ९४२१७८६४८८ Email: skinhikar2@gmail.com

**प्रा. डॉ . नितीन** उल्हासराव सराफ प्राध्यापक, इतिहास विभाग श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय अंजनगाव सुर्जी जि. अमरावती मो.क्र.९७६५३५१११५ Email: nusaraf88@gmail.com

गोषवारा

देशाच्या हिताच्या दृष्टीने एकाच वेळी निवडणुका घेणे योग्य आहे का? भारतात २५ जानेवारी १९५० या दिवशी निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली. संपूर्ण देशातील सर्व निवडणुका पार पाडण्याची जबाबदारी निवडणूक आयोगावर आली. स्वातंत्र्यानंतर भारतात लोकसभा राज्य विधानसभेच्या निवडणुका एकाच वेळी घेण्यात आल्या १९५२, १९५७, १९६२ व १९६७ पर्यंत लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका एकाच वेळी घेण्यात आल्या, हा आयोगाचा निर्णय योग्य होता. परंतु १९६८-६९ मध्ये काही राज्यांच्या विधानसभा कार्यकाल पूर्ण होण्याआधीच विविध कारणांमुळे विसर्जित करण्यात आल्या. सध्या राज्यांच्या विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणुका स्वतंत्रपणे घेतल्या जातात. तेव्हा वर्तमान सरकारचा पाच वर्षाचा कार्यकाळ एकतर संपतो किंवा विधिमंडळ विसर्जित होते. देशात वर्षभरात सरासरी पाच ते सात विधानसभेच्या निवडणुका होतात. यातून निर्माण होणाऱ्या समस्यांमुळे विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणुका एकाच वेळी घेता याव्यात यासाठी निवडणूक आयोगाने तयारी करण्याची सूचना केली. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये सध्या देशात लोकसभा व घटक राज्यांच्या विधानसभेच्या निवडणुका एकाच वेळी घेतल्या तर त्याचा फायदा कोणता होईल? आणि तोटा काय होईल? याविषयी प्रकाश टाकण्यात येत आहे.

प्रस्तावना

भारतात २५ जानेवारी १९५० रोजी निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली. निवडणूक आयोगाने १९५१-५२ मध्ये संपूर्ण देशात सार्वत्रिक निवडणुका घेण्याची घोषणा केली. तेव्हा संपूर्ण भारतात १९५२ साली लोकसभा व घटक राज्य विधानसभांची सार्वत्रिक निवडणूक एकत्रित घेण्यात आली व ती यशस्वी सुद्धा झाली. त्यामुळे १९५७ व १९६२ मध्ये देखील संपूर्ण भारतात एक देश एक निवडणूक या आधारावरच लोकसभा व विधानसभेच्या एकत्रित निवडणुका झाल्या. त्यासुद्धा यशस्वी झाल्या. घटनेतील अनुच्छेद ८३(२) नुसार लोकसभेस आणि अनुच्छेद १७२ नुसार विधानसभेस संपूर्ण पाच वर्षाचा कालावधी बहाल करण्यात आला आहे. १९६७ च्या निवडणुकीनंतर विविध राज्यातील सरकारे वेगवेगळ्या कारणास्तव अल्पमतात येऊ लागली. त्यामुळे एकूण १९६७ नंतर देशातील निवडणुका एक देश एक निवडणूक या संकल्पनेंद्वारे घेण्याची परंपरा विस्कळीत झाली, ती आजही कायम आहे.

वर्षभरात सरासरी पाच ते सात राज्यांमध्ये विधानसभेच्या निवडणुका होतात.त्यामुळे निवडणुकीतून निर्माण होणाऱ्या समस्यांमुळे राज्यांच्या विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणुका एकाच वेळी घेता याव्यात यासाठी भारतीय निवडणूक आयोगाने एक स्वतंत्र यंत्रणा तयार करण्याचे ठरविले होते. वास्तविक अशा तऱ्हेच्या विषयावरील चर्चेचे गुऱ्हाळ १९९० च्या दशकाच्या मध्यापासून

सुरू झालेले होते. १९९९ मध्ये न्यायमूर्ती बी पी जीवन रेड्डी हे कायदा आयोगाचे अध्यक्ष होते. त्यांनीच एक देश एक निवडणूक या विषयावरील आयोगाचा अहवाल तत्कालीन कायदामंत्री राम जेठमलानी यांना सादर केला. त्यानुसार त्यांनी एक देश एक निवडणूक घेण्याचे समर्थन केले.

२००४ मध्ये केंद्रात सत्ता बदल झाल्यामुळे एक देश एक निवडणूक हा विषय मागे पडला. २०१४ मध्ये केंद्रात पुन्हा एकदा सत्ता बदल झाल्यामुळे एक देश एक निवडणूक हा मुद्दा ऐरणीवर आला. २०१५ मध्ये संसदीय स्थायी समितीच्या ७९ व्या अहवालात एकाच वेळी निवडणुका घेण्याचे समर्थन केले गेले. २०१६ मध्ये देशाचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी एकाच वेळी लोकसभा व विधानसभेच्या निवडणुका घेण्याची संकल्पना पुन्हा मांडली. २०१७ मध्ये नीती आयोगाने देखील एकाच वेळी निवडणुकांबाबत एक कार्यपत्र तयार केले होते. एक देश एक निवडणूक हा विषय २०१८ च्या अंदाजपत्रकीय अधिवेशनात भारताचे तत्कालीन माननीय राष्ट्रपती श्री रामनाथ कोविंद यांनी आपल्या अभिभाषणामध्ये या संकल्पनेचे समर्थन केले, तसेच विधी आयोगाने सुद्धा २०१८ मध्ये एक मसुदा तयार केला. ज्यामध्ये असे म्हटले होते की, एकाच वेळी निवडणुका घेण्याच्या शक्यतेसाठी किमान पाच घटनात्मक बदल आवश्यक आहे. त्यासाठी ०२ सप्टेंबर २०२३ रोजी भारत सरकारने एकाच वेळी निवडणुका घेण्यासाठी भारताचे माजी राष्ट्रपती श्री रामनाथ कोविंद यांचे अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची सूचना केली.

एक देश एक निवडणूक संकल्पना :

२६ जानेवारी १९५० मध्ये भारतीय संविधान लागू करण्यात आले. स्वतंत्र भारतातील पहिली सार्वत्रिक निवडणूक ही भारतीय निवडणूक आयोगाच्या स्थापनेनंतर १९५२ मध्ये घेण्यात आली. संपूर्ण भारतात लोकसभा व सर्व प्रांतातील विधानसभा यांची निवडणूक एकत्रितरित्या झाली. त्यानंतर १९५२, १९५७ व १९६२ मध्ये सुद्धा याच पद्धतीने एक देश एक निवडणूक ही संकल्पना यशस्वीरित्या राबवली गेली. म्हणजेच संपूर्ण देशात लोकसभा व घटक राज्य विधानसभेच्या निवडणुका एकत्र होणे हीच एक देश एक निवडणूक संकल्पना होय. विद्यमान मध्यवर्ती सरकार एक देश एक निवडणूक संकल्पना राबविण्यात उत्सुक व आग्रही दिसतात.

विधी आयोगाने २०१८ मध्ये तयार केलेल्या मसुद्यानुसार, एक देश एक निवडणूक घेण्याकरिता पुढील किमान पाच घटनात्मक बदल आवश्यक असल्याचे मत मांडले होते. त्या घटनात्मक बदलानुसार संविधान, लोकप्रतिनित्व कायदा १९५१ आणि लोकसभा व राज्य विधानसभेच्या कार्यपद्धतीच्या नियमांमध्ये योग्य सुधारणा करणे, विधी आयोगाने ५०% राज्याकडून एक देश एक निवडणुकीसाठी मान्यता मिळावी, अशा शिफारशी केल्या होत्या.

एक देश एक निवडणूक ही संकल्पना कागदावर खूपच चांगली वाटत असली तरी त्यात अनेक अंतर विरोध आहे. याची अंमलबजावणी हे एक मोठे आव्हान आहे. कळीचा मुद्दा म्हणजे लोकसभा किंवा राज्य विधानसभा मुदतीपूर्वी बरखास्त झाल्यास उद्भवणाऱ्या परिस्थितीचा, अशावेळी मोठा पेच निर्माण होऊ शकतो.

एकत्रित निवडणुकीचा प्रस्ताव सध्या समोर येण्याची मुख्य कारण म्हणजे भारतीय लोकशाही कडून ज्या प्रकारच्या अपेक्षा आहेत त्या पूर्ण होत नाहीत. आपल्याकडे लोकशाही व्यवस्थेला निवडणुकांच्या दृष्टिकोनातून पाहिले जाते. सातत्याने होणाऱ्या निवडणुका या भारतीय लोकशाहीचे

प्रतीक मानले गेले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक देश एक निवडणूक यासंदर्भात चर्चा होऊन राष्ट्रीय पातळीवर या मुद्द्यावर सहमती व्हावी अशा स्वरूपाचे विधान सर्वपक्षीय बैठकीत केल्यानंतर देशभरात पुन्हा एकदा मोठी चर्चा सुरू झाली आहे. या संपूर्ण प्रस्तावाला काही राजकीय पक्षांचा विरोध आहे तर काहींची सहमती. तथापि या संपूर्ण प्रक्रियेकडे पक्षीय राजकारणाच्या पलीकडे जाऊन भारतीय लोकशाहीच्या सबलीकरणाच्या दृष्टिकोनातून देशात सुशासन निर्माण करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे ही यंत्रणा प्रत्यक्षात आणण्यासाठी आवश्यक असणाऱ्या तांत्रिक बाबीही समजून घेणे आवश्यक आहे.

एकत्रित निवडणुकांचा प्रस्ताव समोर येण्याचे कारण म्हणजे आपल्या भारतीय लोकशाही कडून ज्या अपेक्षा आहेत त्या संपूर्ण होत नाहीत या संकल्पनेला अनुभव देणारा आणि विरोध करणारा असे दोन गट भारतात पहावयास मिळतात. समर्थन करणारे खर्चाच्या बाबींचा विचार करून, एक समान धोरण निर्मितीला उपयुक्त असे वातावरण निर्माण होईल या उद्देशाने एक देश एक निवडणूक लागू झाली पाहिजे असे मत मांडताना दिसतात. त्याचप्रमाणे देशात सातत्याने निवडणूक होत असल्याने शासनाला लोकांच्या कल्याणासाठी दीर्घकालीन योजना राबविता येत नाहीत. त्याचप्रमाणे निवडणुका म्हटल्या की त्यासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ म्हणजे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा मोठ्या प्रमाणात वापर होत असल्यामुळे शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होते. कमी खर्च कमी श्रमात एकाच वेळी दोन्ही निवडणुका घेणे शक्य आहे असे मानणारा वर्ग भारतात द्विपक्षीय व्यवस्था अस्तित्वात येईल असे मानतो.

असे असले तरी एकाच वेळी निवडणुका लोकसभा, राज्य विधानसभांच्या निवडणुका घेणे सद्यस्थितीत आयोगाला सुद्धा सहज शक्य नाही असे दिसते, याचे मुख्य कारण म्हणजे आपल्याकडील सुरक्षा यंत्रणेचा अभाव हे देखील सांगता येते. एकाच वेळी निवडणुका घेतल्यास मोठ्या प्रमाणात मतदान यंत्राची व्यवस्था करावी लागेल, याची आपल्याकडे व्यवस्था नाही. त्याचप्रमाणे निवडणुका व मतदानाच्या काळात हजारोंच्या संख्येत सुरक्षा यंत्रणा आवश्यक असते, अर्धसैनिक दल देखील सोबत ठेवावे लागते. त्यांची संख्या पुरेशी नसल्यामुळेच टप्प्याटप्प्याने निवडणुका घेतल्या जाव्यात, अशी मागणी करताना राजकीय पक्ष दिसतात. त्यांच्या मागणीनुसार सध्या भारतात लोकसभेत मतदान करणाऱ्यांची संख्या जवळपास ९७ कोटी इतकी झाली असून निवडणुका यशस्वीरित्या पार पडण्यासाठी आवश्यक त्या सुविधा ह्या अपुऱ्या आहेत.

विरोध असणाऱ्यांच्या मतानुसार एक देश एक निवडणूक लागू झाल्यास प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व धोक्यात येईल, कारण देशात द्विपक्षीय व्यवस्था अस्तित्वात येईल. सगळे लक्ष राष्ट्रीय प्रश्नाकडे आकर्षित झाल्यामुळे स्थानिक प्रश्नांचे महत्त्व संपुष्टात येईल, अशा होणाऱ्या निवडणुकांमध्ये राष्ट्रीय प्रश्नांना अधिक महत्त्व दिले जाईल, त्यामुळे याचा परिणाम होऊन स्थानिक प्रश्न, समस्या यांच्याकडे दुर्लक्ष होऊन राज्यांच्या अस्मितेला तडा जाईल. त्याचप्रमाणे एक देश एक निवडणुकीमुळे राजकीय पक्ष केवळ एकदा मतदारांना उत्तरदायी राहतील आणि सातत्याने निवडणूक होत राहिल्यास ते कायमस्वरूपी जनतेला उत्तरदायी राहतील, यामुळेच या निवडणुका वेगवेगळ्या वेळी का होऊ नये ? असा अभ्यासकांचा सवाल आहे

देशात एक देश एक निवडणूक लागू झाल्यास आपल्या देशात हुकुमशाही आणण्याचा डाव आहे

असा स्पष्ट आरोप भारिप बहुजन महासंघाचे अध्यक्ष व माजी खासदार ॲड प्रकाश आंबेडकर करतात. १९६७ सालापासून जी एकत्रित निवडणुका घेण्याची परंपरा विस्कळीत झाली आहे ती घडी सावरण्यासाठी एक देश एक निवडणूक अशा तऱ्हेची जोखीम पत्करण्या वाचून दुसरा पर्याय देखील नाही हेही तितकेच खरे आहे.

संदर्भ ग्रंथ सूची:


1. http://testbook.com > ias- preparation
2. Wikipedia- http://en.wikipidia.org > wiki > on
3. ॲड गणेश सोवनी, 'एक देश, एक निवडणूक' संकल्पना चांगली पण जोखमीची, दैनिक लोकसत्ता, रविवार विशेष, रविवार २८ जानेवारी २०१८.
4. तुकाराम जाधव, महेश शिरापुरकर, भारतीय राजकीय व्यवस्थेचा आकृतिबंध, खंड १, भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया, युनिक ॲकॅडमी, पब्लिकेशन प्रा. लि., पुणे, आवृत्ती पहिली, २०११.
5. डॉ अलका विनायक देशमुख, भारतीय शासन आणि राजकारण, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, चौथी आवृत्ती, १५ ऑगस्ट २०१४.